TheHitavada
Nagpur City Line | 2021-04-15 | Page- 1
ehitavada.com

# Law University contributes largely to development of national perspective: CJI Bobde

- We need a generation that would be committed to the society, says CM Uddhav Thackeray
- Academic building of Maharashtra National Law University at Nagpur inaugurated

**Principal Correspondent**

"JUDICIARY is a very important pillar of democracy. To strengthen it, good quality legal education is required and the National Law University here is playing an important role. The university will definitely make a significant contribution to the development of national vision and character," said Chief Justice of India Sharad Bobde. He was speaking during inauguration of academic building of Maharashtra National Law University (MNLU) at Waranga on Wednesday.

The inauguration was done on virtual platform in presence of Chief Justice on India and Founder Chancellor of the University Sharad Bobde, Chief Minister Uddhav Thackeray, Union Minister of Transport Nitin Gadkari, Supreme Court Justice Bhushan Gavai, Chief Justice of Bombay High Court Dipankar Dutta, Energy Minister and Guardian Minister of Nagpur district Dr Nitin Raut, Higher and Technical Education Minister Uday Samant and Leader of Opposition in State Assembly Devendra Fadnavis, Senior Administrative Judge of Nagpur Bench of Bombay High Court Justice Sunil Shukre; Vice-Chancellor of the University Prof Dr Vijendra Kumar and others.



Chief Justice of India Sharad Bobde delivering the speech.

The Chief Justice gave a brief overview of the creation of the University. Given the glorious tradition of the best jurists in the city of Nagpur, the people here wanted a National Law University. Expressing satisfaction that their dream is coming true today Justice Bobde said, "The academic building of the university is a beautiful invention of modern architecture. The construction of classrooms in this building is world class. These classrooms are equipped with the latest technology."



Justice Bhushan Gavai to be Chancellor of MNLU

Justice Bobde pointed out, "Construction of this building, which is of excellent quality and environment-friendly, fulfills the aspirations of the students." He mentioned the efforts made by Justice Bhushan Gavai and Mumbai High Court Chief Justice Dipankar Dutta for establishment of the university.

Announcing that Justice Bhushan Gavai would take the charge as Chancellor of MNLU, Chief Justice Sharad Bobde said, "The National Law University here is unique. This university will help to develop a national outlook. Because professors and students from all over the country will come and teach here. This university will go beyond the thought of regionalism and narrow

(Contd on page 2)

Powered by Bharati Web Pvt Ltd

**The Hitavada / CityLine / Thursday / April 15, 2021/Page No. 1 & 2**

TheHitavada
Nagpur City Line | 2021-04-15 | Page- 2
ehitavada.com

# Law University contributes largely to development of national perspective...

mindedness and would create jurists with national character.

Chief Justice Sharad Bobde expressed confidence that the way MNLU is moving ahead, it would earn the level of Oxford-Harvard-Cambridge University. Another feature of this university is the inclusion of jurisprudence courses. Due to this, the rich knowledge tradition of this subject in India has been linked with the university. He also hoped that future generations would be thankful for the results.

Chief Minister Uddhav Thackeray said, "Maharashtra, which abides by the framework of law, has a long and exemplary tradition of justice. It was carried forward by judges like Ramshastri Prabhune. The role of the four pillars is important in a democracy. They give strong support to democracy." Chief Minister expressed the expectation that the university should create lawyers and jurists who are able to hold the roof of democracy."

"Just as the sculptor creates an idol by putting his heart into it, professors at the University of Law should play their roles and shape students. Dr Babasaheb Ambedkar took to the streets and fought for the common man. Accordingly, this institution should produce judges who would have commitment towards poor. The University of Law is a large institution that respects and supports the field of justice. This greatness should be used by the smallest man, and it should become the best university in the world," hoped Uddhav Thackeray.

Stating that the university was set up with the objective of creating a world class university that would introduce qualitative change in the field of law, Nitin Gadkari said, "One of the pillars of a strong democracy is the judiciary. The University of Law will play an important role in establishing it."

Gadkari in his speech specially mentioned the contribution of Justice Vikas Sirpurkar, retired judge of Supreme Court and Justice Bhushan Gavai, Judge of Supreme Court in creation of MNLU.

Stating that the creation of this university is the moment of self-satisfaction, Justice Gavai said that the concept of Gurukul is being actualised by this university. The values required for democracy are reflected in this university. We have succeeded in completing most of the work in the last five years. Various departments of the government, including the Chief Justice and the then and present rulers, cooperated, added Justice Gavai.

C Ramesh Kumar, OSD (Academics and Construction) proposed a vote of thanks while Dr Ashish Dixit, Registrar gave introductory speech.

# Ambedkar worked to make Sanskrit official language: CJI

**VIVEK DESHPANDE**
NAGPUR, APRIL 14

CHIEF Justice of India S A Bobde on Wednesday claimed that the late B R Ambedkar had prepared a proposal to make Sanskrit the official language of India but the move did not succeed.

"I was wondering in which language should I speak, Marathi or English. This dilemma is being witnessed in our country for a long time. I have seen this question cropping up frequently as to which language should the courts function in. We have High Courts with official language as English and Hindi. Some want Tamil, some others want Telugu. I want to humbly submit that nobody is paying attention to this subject. Dr Ambedkar, however, had anticipated this and had prepared a proposal. I don't know if that proposal was tabled. It had signatures of some mullahs, pandits and priests and of doctor Ambedkar himself. The proposal was that the official language of Union of India should be Sanskrit," Justice Bobde said while addressing an event to mark the inauguration of the academic building of the Maharashtra National Law University at Nagpur.



Chief Justice S A Bobde

"Ambedkar was of the opinion that Tamil won't be accepted in North India and Hindi won't be accepted in South India. But Sanskrit won't be opposed in either North India or South India. So he had made this proposal which did not succeed."

Justice Bobde said, "Ambedkar wasn't an expert in law only but was seized of what was going on socially and politically too. He knew what people wanted, what the poor wanted. That's why, I think, he had thought of this proposal. But finally English was made official language. So with your permission, this being the national law university, I will speak in English."

The CJI congratulated the NLU for introducing a course in "nyay shastra", the ancient jurisprudence in Sanskrit. "The Indian judiciary draws its jurisprudence from Anglo-saxon model which is based on Aristotelian and Persian logic. When I read about nyay shastra, I found that it is not a bit inferior to the Aristotelian system. I see no reason that we should forsake, overlook and not benefit from the genius of our ancestors," Justice Bobde said.

**FULL REPORT ON**
**www.indianexpress.com**

**The Indian Express / Thursday / April 15, 2021/Page No. 5**

Lokmat Times

# 'Quality law education must for strong judiciary'

**Maharashtra National Law University campus inaugurated by CJI Bobde in Waranga village**

**LOKMAT NEWS NETWORK**
NAGPUR, APRIL 14

The judiciary is a very important pillar of democratic set up. High quality law education is required to strengthen it. In view of this, the National Law University will prove to a very important milestone in the country. This university will definitely contribute in building national outlook and character, said Chief Justice of India Sharad Bobde.

The educational campus of Maharashtra National Law University was inaugurated at the hands of chancellor Sharad Bobde in Waranga on Wednesday. During online inauguration function, chief minister Uddhav Thackeray, Union minister for surface transport Nitin Gadkari, Justice Bhushan Gavai of Supreme Court, Chief Justice of Bombay High Court Deepankar Datta, energy minister and guardian minister of district Nitin Raut, minister for higher and technical education Uday Samant, Leader of Opposition in Legislative Assembly Devendra Fadnavis, Justice Sunil Shukre of Nagpur Bench of Bombay High Court and university's vice-chancellor Dr Vijendra Kumar participated.

At the outset, Chief Justice of India Sharad Bobde spoke about the journey behind formation of the Law University and announced that Justice Bhushan Gavai will be the chancellor of university. CJI Bobde said, "This university will help in developing national outlook as teachers and students from all over country will come here. This university will prove to be of global standard like Oxford, Harvard and Cambridge Universities. The inclusion of jurisprudence course will be another speciality of this university."



Chief Justice of India (CJI) Sharad Bobde addressing the law fraternity during the virutal inaguration of Maharashtra National Law University (MNLU) at Waranga village on Wednesday.

Union minister Gadkari said, "This university has been formed with an objective of bringing qualitative change in legal field due to international level university."

Chief Justice Deepankar Datta said, "It is expected that better judges and legal experts will come of this university having world class amenities."

The guardian minister Raut said that there is satisfaction of completing university building and works of campus during difficult and coronavirus pandemic period.

Leader of Opposition Devendra Fadnavis said, "Rule of law is necessary for establishing values of democratic set-up. A strong judiciary is necessary for better rule of law. This university will contribute a lot in this direction." Justice Sunil Shukre said that it is a matter of pride that Law University has come up in the city having Deekshabhoomi which gives message of equality. The message of deputy chief minister Ajit Pawar was also read out during the programme. Prof Ashish Singh made introductory remarks. Prof Rameshkumar proposed a vote of thanks. Retired Justice of Supreme Court V S Sirpurkar also attended the online programme.

**'Maharashtra got ideal tradition of justice'**

Chief minister Uddhav Thackeray said, "Maharashtra has a big and ideal tradition of giving justice to every criterion of law. The tradition of justice was very ideal during Swaraj of Chhatrapati Shivaji Maharaj. Judges like Ramshastri Prabhune took this tradition forward. Roles of all pillars of democratic set-up are important."

Nagpur First
Page No. 1 Apr 15, 2021
Powered by: erelego.com

**Lokmat Times / Nagpur First / Thursday / April 15, 2021/Page No. 5**

# 'MNLU-N to produce judges who can directly be recruited'

## CJI Sharad Bobde Inaugurates New Academic Block Of University

Vaibhav.Ganjapure
@timesgroup.com

Ranjit Deshmukh






The new academic block (left) of MNLU-N at Waranga on Wardha Road. CJI Sharad Bobde releasing a book on court's history at HC auditorium

**Nagpur:** Maharashtra National Law University (MNLU) here would produce judicial officers on the lines of the National Defence Academy through new courses introduced by it, said Chief Justice of India (CJI) Sharad Bobde.

Speaking at the inauguration MNLU-N's new academic block at Waranga on Wardha Road on Wednesday, the CJI said the premier law

**MAJOR PUSH**

institution had also introduced a course in 'Nyaya Shastra' based on the ancient Indian judicial system.

Supreme Court judge Bhushan Gavai, Bombay High Court Chief Justice Dipankar Datta, Nagpur bench administrative judge Sunil Shukre were with the CJI at the new campus.

Chief minister Uddhav Thackeray, Union road transport minister Nitin Gadkari, higher and technical education minister Uday Samant, guardian minister Nitin Raut and leader of opposition Devendra Fadnavis joined virtually.

MNLU-N vice-chancellor Vijender Kumar shared the dais and officer on special duty Ramesh Kumar, also the incharge of the building committee, addressed the students. Deputy CM Ajit Pawar couldn't attend the event due to emergency but he sent a congratulatory message.

Explaining the innovative courses introduced by the MNLU-N, CJI Bobde, who is also the university's chancellor, said when the students pursuing specialized courses for judicial officers would graduate, they wouldn't need to undergo training for judges and can be directly recruited.

"The other course in Nyay Shastra was a bit difficult to impart as it was in Sanskrit. MNLU-N tied up with Ramtek-based Kavi Kulguru Kalidas Sanskrit University. We have inherited the judicial system from the British. But our ancient system isn't inferior to anyone. The benefits of introducing these innovative courses would be realized in the long run," he said.

Explaining the MNLU-N's specialities, Bobde said it intended to impart a national outlook to all those who study here. "The students and faculty hail from across India. There's no regionalism or narrow mindedness that distinguishes this institution from ordinary law colleges. Its classrooms are world-class having all hi-tech devices under one roof. The facilities provided can be compared to globally renowned institutions like Harvard, Oxford and Cambridge."

About the MNLU-N's concept, the CJI said it was first mooted by former SC judge Vikas Sirpurkar to then President Pratibha Patil, who instantly agreed to it. "Gadkari then advised us to meet Fadnavis, who as the then CM supported the concept that led to a dream turning into a reality. Today, I am extremely proud to see this magnificent edifice. The entire credit goes to architect Paramjit Singh Ahuja and his team."

Stressing that change in the government didn't adversely affect MNLU-N's development, the CJI said it was a tribute to the entire political leadership. I must express gratitude to the CM and Raut for their unflinching support," he said.

Justice Gavai said CJI had clearly told his vision about MNLU-N in 2016 that it should be different from other law schools and impart innovative courses.

### Gavai nominated as MNLU-N chancellor

CJI Sharad Bobde declared that justice Bhushan Gavai would succeed him as MNLU-N chancellor. "Gavai has made untiring efforts for this institution, being a chairman of its building construction committee. His enthusiasm is infectious and even pro-chancellor Justice Dutta has inherited it. The original idea was to have the concept of Gurukul, the ancient concept, where the students could be taught under the tree. I am sure with facilities like the research centre, yoga, meditation, there would be fruitful interaction among the students and teachers," the CJI said.

**The Times of India / Times City / Thursday / April 15, 2021/Page No. 4**

लोकमत

# राष्ट्रीय दृष्टिकोनासाठी विधी विद्यापीठाचे योगदान महत्त्वाचे

## सरन्यायाधीश बोबडे : महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीचे उद्‌घाटन; न्या. भूषण गवई कुलपती होणार



### महाराष्ट्राला न्यायदानाची आदर्श परंपरा लाभली : मुख्यमंत्री

कायद्याची चौकट पाळणाऱ्या महाराष्ट्राला न्यायदानाची मोठी आणि आदर्श परंपरा लाभली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातही न्यायदानाची परंपरा अत्यंत आदर्शवत होती. रामशास्त्री प्रभुणेंसारख्या न्यायदात्यांनी ती पुढे चालवली. लोकशाहीत चार स्तंभाची भूमिका महत्त्वाची असते. त्यातून लोकशाहीला मजबूत आधार मिळत असतो, असे मत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केले. लोकशाहीचे छत समर्थपणे तोलून धरणारे वकील, विधिज्ञ या विद्यापीठात घडावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** न्यायव्यवस्था हा लोकशाही व्यवस्थेचा अतिशय महत्त्वाचा स्तंभ आहे. तो मजबूत करण्यासाठी उत्तम दर्जाच्या विधी शिक्षणाची आवश्यकता असून येथील राष्ट्रीय विधी विद्यापीठ त्या दृष्टीने महत्त्वाचे आणि जागतिक दर्जाचे ठरणार आहे. राष्ट्रीय दृष्टिकोन आणि चारित्र्य विकसित करण्यासाठी हे विद्यापीठ निश्चितच महत्त्वाचे योगदान देईल, असा आशावाद देशाचे सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी बुधवारी येथे व्यक्त केला.

शहराजवळच्या वारंगा येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीचे उद्‌घाटन सरन्यायाधीश तथा या विद्यापीठाचे संस्थापक कुलपती शरद बोबडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. दूरदृष्य प्रणालीद्वारे झालेल्या या कार्यक्रमास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, केंद्रीय भूपृष्ठ व परिवहन मंत्री नितीन गडकरी, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता, ऊर्जामंत्री तथा पालकमंत्री नागपूर नितीन राऊत, ऊर्जा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती सुनील शुक्रे, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. विजेंद्रकुमार आदी उपस्थित होते.

प्रारंभी विधी विद्यापीठाच्या निर्मितीमागचा ओझरता प्रवास सरन्यायाधीश बोबडे यांनी मांडला. न्यायमूर्ती भूषण गवई हे या विधी विद्यापीठाचे कुलपती असतील, असे त्यांनी जाहीर केले. या विद्यापीठातून राष्ट्रीय दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होणार आहे. कारण देशभरातील प्राध्यापक आणि विद्यार्थी येथे अध्ययन-अध्यापन करणार आहेत. ऑक्सफर्ड- हॉर्वर्ड-केंम्ब्रिज या विद्यापीठाच्या तोडीचे विद्यापीठ ठरणार आहे. न्यायशास्त्र अभ्यासक्रमाचा समावेश, हे या विद्यापीठाचे दुसरे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी सांगितले.

गडकरी म्हणाले, विधी क्षेत्रात गुणात्मक बदल व्हावा, त्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे विद्यापीठ उभारावे या उद्देशाने या विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. जागतिक दर्जाच्या सुविधा असलेले हे विद्यापीठ असून यातून सर्वोत्कृष्ट न्यायाधीश व विधिज्ञ घडावेत, अशी अपेक्षा न्यायाधीश दीपांकर दत्ता यांनी व्यक्त केली. पालकमंत्री डॉ.राऊत यांनी विद्यापीठाची ही इमारत आणि परिसरातील इतर काम अतिशय कठीण अशा कोविड काळात करण्यात यश आल्याचे समाधान व्यक्त केले.

लोकशाही मूल्य प्रस्थापित होण्यासाठी कायद्याचे राज्य गरजेचे आहे. तर कायद्याच्या राज्यासाठी मजबूत न्यायव्यवस्था आवश्यक आहे त्यासाठी हे विद्यापीठ मोठे योगदान देईल, असे प्रतिपादन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केले. समतेची शिकवण देणाऱ्या दीक्षाभूमीच्या शहरात विधी विद्यापीठ स्थापन होणे हे आनंददायी असल्याचे मत न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी व्यक्त केले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या संदेशाचे वाचन यावेळी करण्यात आले.

प्रास्ताविक प्रा.आशिष सिंग यांनी प्रास्ताविक केले तर आभार प्रा. सी. रमेशकुमार यांनी मानले. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती व्हि.एस. सिरपूरकर यांची यावेळी उपस्थिती होती.

Nagpur Main
Page No. 3 Apr 15, 2021
Powered by: erelego.com

लोकमत Feedback

# संस्कृतला राष्ट्रभाषा करण्याचा बाबासाहेबांचा प्रस्ताव

## सरन्यायाधीश शरद बोबडे यांचे प्रतिपादन

लोकसत्ता प्रतिनिधी

**नागपूर :** देशातील काही उच्च न्यायालयांचे काम हे इंग्रजीतून तर काहींचे हिंदीमधून चालते. काहींना कामकाजाची भाषा तमिळ हवी आहे तर काहींना तेलगू हवी आहे. या अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या भाषांसाठी होत असलेल्या मागणीकडे कुणीही लक्ष देत नाही. मात्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाची राष्ट्रभाषा ही संस्कृत असायला हवी असा प्रस्ताव दिला होता. तोही मान्य न झाल्याने कार्यालयीन कामकाजाची नेमकी भाषा कुठली असावी हे द्वंद्व आजही सुरूच आहे, असे प्रतिपादन सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी केले.


शरद बोबडे

उपराजधानीजवळच्या वारंगा येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन सरन्यायाधीशांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, पालकमंत्री नितीन राऊत, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आदी ऑनलाईन तर कार्यक्रमस्थळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश दीपांकर दत्ता, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती सुनील शुक्रे उपस्थित होते.

सरन्यायाधीश पुढे म्हणाले की, देशाचा सरन्यायाधीश म्हणून देशातील अन्य न्यायालयांचे निवेदन करताना न्यायालयाची नेमकी भाषा कुठली असावी हा प्रश्न पडतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाची राष्ट्रभाषा ही संस्कृत राहायला हवी असा प्रस्ताव दिला होता. ज्यावर अनेक विद्यार्थी आणि पंडितांचीही स्वाक्षरी होती. कारण, उत्तर भारतात तामिळला तर दक्षिण भारतात हिंदीला विरोध होऊ शकतो हे त्यांना माहिती होते. त्यामुळे त्यांनी संस्कृतचा प्रस्ताव दिला होता. बाबासाहेब हे केवळ कायदेपंडितच नव्हते तर त्यांना समाजाचे, राजकारणाचे आणि येथील गोरगरिबांच्या प्रश्नांचीही जाण होती. या सर्वांचा विचार करूनच त्यांनी ह प्रस्ताव दिला होता. मात्र, तो मान्य झाला नाही, अशी खंत सरन्यायाधीशांनी व्यक्त केली. राष्ट्रीय ओळख मिळवून देणाऱ्या विधि विद्यापीठात देशाच्या विविध भागातील विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा उच्च दर्जाचे न्यायाधीश आणि अधिवक्ता येथे घडावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. शरद बोबडे हे विधि विद्यापीठ उभारणारे खरे वास्तुविशारद आहेत, अशा शब्दात गडकरींनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी कुलगुरू विजेंद्र कुमार, विशेष कार्य अधिकारी प्रा. रमेश कुमार, कुलसचिव आशीष दीक्षित उपस्थित होते.

### सरन्यायाधीश जयंतीला पुण्यतिथी म्हणाले...

भाषणाला सुरुवात करत असताना सरन्यायाधीश बोबडे यांनी 'आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुण्यतिथीनिमित्त मला एक प्रसंग आठवला', असे विधान केले. त्यामुळे उपस्थितांमध्ये कुजबूज सुरू झाली. कारण, १४ एप्रिल रोजी बाबासाहेबांची जयंती असते, पुण्यतिथी नाही.

### 'न्यायमूर्ती घडवणारे मूर्तिकार महत्त्वाचे'

विधि विद्यापीठाचे शिक्षक हे मूर्तिकार आहेत. न्यायमूर्ती घडवणारे हे मूर्तिकार हे फार महत्त्वाचे आहेत. त्यामुळे तुम्ही जीव ओतून शिकवले पाहिजे. कारण देशाचे, लोकशाहीचे छत्र समर्थपणे तोलून धरणारे वकील, विधिज्ञ या ठिकाणी घडतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले. बाबासाहेबांनी सामान्यांसाठी रस्त्यावर उतरून लढाई लढली. त्यामुळे या संस्थेतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या ज्ञानाचा उपयोग छोट्यातल्या छोट्या माणसांसाठी कसा होईल याचा प्रयत्न करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

लोकसत्ता Thu, 15 April 2021 https://epaper.loksatta.com/c/59786620

**Loksatta / Thursday / April 15, 2021/Page No. 2**

# संस्कृत ही राष्ट्रभाषा असावी ; बाबासाहेबांचा प्रस्ताव होता !

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

'न्यायालयाच्या कामकाजाची भाषा कोणती असावी, यावर वारंवार चर्चा होत असते. उच्च न्यायालयांच्या कामकाजासाठी वेगवेगळ्या भाषांची मागणी देशातील विविध प्रांतांमध्ये होत असते. मात्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संस्कृत ही भारताची राष्ट्रभाषा असावी, असा प्रस्ताव मांडला होता. मात्र, तो मान्य होऊ शकला नाही', अशी माहिती सरन्यायाधीश न्या. शरद बोबडे यांनी बुधवारी येथे दिली.



नागपूरजवळील वारंगा येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी सरन्यायाधीश बोलत होते. बुधवारी न्या. बोबडे यांच्या हस्ते या इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत, पालकमंत्री डॉ. नितीन राऊत ऑनलाइन स्वरुपात उपस्थित होते. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश दीपांकर दत्ता, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती सुनील शुक्रे प्रामुख्याने उपस्थित होते. डॉ. आंबेडकर यांनी मांडलेल्या प्रस्तावाला अनेक तज्ज्ञांचे समर्थन होते. उत्तर भारतात तमिळला तर दक्षिण भारतात हिंदीला विरोध होऊ शकतो, याची जाणीव त्यांना होती. सामाजिक, राजकीय आणि गोरगरिबांच्या परिस्थितीची जाण त्यांना होती. सर्वंकष विचार करून त्यांनी हा प्रस्ताव दिला होता. त्याकरिता त्यांनी विविध धर्मांतील प्रमुखांशी चर्चाही केली होती. मात्र, हा प्रस्ताव प्रत्यक्षात येऊ शकला नाही, असे सरन्यायाधीश म्हणाले.

चांगल्या न्यायव्यवस्थेसाठी उत्तम न्यायशिक्षण देणाऱ्या संस्थांचे पाठबळ असणे गरजेचे आहे. देशभरातील विद्यापीठांनी या विद्यापीठात प्रवेश घ्यावा आणि उत्तम दर्जाचे न्यायाधीश आणि अधिवक्ता येथून तयार व्हावेत, अशी अपेक्षाही सरन्यायाधीशांनी व्यक्त केली.

'सरन्यायाधीश बोबडे हे या प्रकल्पाचे यशस्वी आर्किटेक्ट आहेत. निवृत्त न्यायमूर्ती विकास सिरपूरकर, विद्यमान न्यायमूर्ती भूषण गवई तसेच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही भूमिका महत्त्वाची आहे', असे गडकरी म्हणाले. विधी विद्यापीठाची अत्यंत कमी कालावधीत उभारणी करण्यात बोबडे यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. हे विद्यापीठ भारतीय न्यायव्यवस्थेसाठी उत्तम मानव संसाधने निर्माण करेल अशी आशा आहे, असे फडणवीस म्हणाले. औरंगाबाद आणि मुंबई येथेही नागपूरप्रमाणे विधी विद्यापीठ संकुलाचे निर्माण करण्याचा मानस असल्याचे सामंत म्हणाले. पालकमंत्री नितीन राऊत तसेच इतर न्यायमूर्तींनीदेखील यावेळी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजेंदर कुमार यांनी प्रास्ताविक केले.

### सरन्यायाधीशांची माहिती; विधी विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीचे उद्घाटन


उद्घाटन कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करताना सरन्यायाधीश शरद बोबडे.

### विधी विद्यापीठातील शिक्षक महत्त्वाचे मूर्तिकार!

'सरकार कुणाचेही असो किंवा मुख्यमंत्री कुणीही असो, न्यायव्यवस्थेला साहाय्यभूत ठरणाऱ्या संस्थांना मदत करण्यात राज्य सरकार कुचराई करणार नाही. न्यायमूर्ती आणि वकील निर्माण करणारे विधी विद्यापीठातील शिक्षक हे महत्त्वाचे मूर्तिकार आहेत. या संस्थेतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांनी लहानात लहान माणसासाठी आपल्या ज्ञानाचा कसा उपयोग होईल याचा विचार करावा', असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**Maharashtra Times / Nagpur Plus / Thursday / April 15, 2021/Page No. 1**

# राष्ट्रीय दृष्टिकोन विकासासाठी विधी विद्यापीठ महत्त्वपूर्ण

## सरन्यायाधीश शरद बोबडे; महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीचे उद्घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

नागपूर, ता. १४ : लोकशाहीच्या चौथा स्तंभ असलेल्या न्यायव्यवस्थेला मजबूत करण्यासाठी चांगली विधी शिक्षण प्रणालीची आवश्यकता आहे. त्यासाठी महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाची निर्मिती करण्यात आली. त्यासाठी माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्यासह विविध राजकीय व्यक्तींचे योगदान आहे. त्यामुळे महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ त्या दृष्टीने महत्त्वाचे आणि जागतिक दर्जाचे ठरणार आहे. राष्ट्रीय दृष्टिकोन आणि चारित्र्य विकसित करण्यासाठी हे विद्यापीठ निश्चितच महत्त्वाचे योगदान देईल, असा आशावाद देशाचे सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी आज येथे व्यक्त केला.



**उद्घाटन कार्यक्रमात बोलताना सरन्यायाधीश शरद बोबडे.**

पान २ वर »

### राष्ट्रभाषा संस्कृत असावी हा बाबासाहेबांचा प्रस्ताव

देशात न्यायदान करताना नेमकी कोणती भाषा असावी याबाबत नेहमी चर्चा होत असते. मात्र, काही न्यायालयात इंग्रजी तर काही हिंदी आणि मराठीतून कामकाज करतात. मात्र, देशाची राष्ट्रभाषा कोणती असावी याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तेव्हा एक प्रस्ताव तयार केला होता. त्यात त्यांनी देशाची राष्ट्रभाषा संस्कृत असावी असे त्यात नमूद केले होते. मात्र, त्याचे काय झाले ते माहिती नाही. मात्र, हिंदीला दक्षिणेकडे विरोध आणि तमीळ आणि इतर भाषांना हिंदीबहुल राज्यात विरोध झाला असता, त्यामुळेच संस्कृत भाषा दोन्हीकडे मान्य असती त्यामुळे बाबासाहेबांनी या भाषेला राष्ट्रभाषा करण्यात यावी असा प्रस्ताव केला असावा असे न्या. बोबडे म्हणाले.

मराठी अनुवादित ग्रंथ विधी क्षेत्रासाठी उपयुक्त

पान २ वर »

**Sakal / Nagpur Today / Thursday / April 15, 2021/Page No. 1 & 2**

« पान १ वरून

# राष्ट्रीय दृष्टिकोन विकासासाठी विधी...

वारंगा येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीचे उद्घाटन सरन्यायाधीश तथा या विद्यापीठाचे संस्थापक कुलपती शरद बोबडे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. दूरदृष्य प्रणालीद्वारे झालेल्या या कार्यक्रमास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, केंद्रीय भूपृष्ठ व परिवहन मंत्री नितीन गडकरी, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती दिपांकर दत्ता, पालकमंत्री नितीन राऊत, ऊर्जा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती सुनील शुक्रे, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ.विजेंद्रकुमार उपस्थित होते.

न्या. शरद बोबडे म्हणाले, या विद्यापीठातून विद्यार्थ्यांना थेट न्यायाधीश होण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. अभ्यासक्रमात त्यांना कोर्टरुमचा अनुभव, न्यायाधीशांसोबत वेळ घालविणे आणि इतरही प्रशिक्षण मिळणार आहे. त्यामुळे अभ्यासक्रम संपल्यावर ते न्यायाधीश होण्यास पात्र ठरतील.

**गरिबांना न्याय मिळावा**

संस्थेतून गोरगरिबांशी बांधीलकी जोपासणारे न्यायमूर्ती तयार व्हावेत. न्यायदानाच्या क्षेत्राला आदर आणि आधार देणारी विधी विद्यापीठ मोठी संस्था आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातही न्यायदानाची परंपरा अत्यंत आदर्शवत होती. रामशास्त्री प्रभुणेसारख्या न्यायदात्यांनी ती पुढे चालवली. लोकशाहीचे छत समर्थपणे तोलून धरणारे वकील, विधिज्ज्ञ या विद्यापीठात घडावेत, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

**न्या. गवई नवे कुलपती**

सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी आपल्या भाषणात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश भूषण गवई विद्यापीठाचे नवे कुलपती असतील अशी घोषणा केली. सरन्यायाधीश २३ एप्रिलला सेवानिवृत्त होणार आहेत. न्या.बोबडे विद्यापीठाचे पहिले कुलपती होते. १३ एप्रिलला न्या. गवई यांची कुलपती म्हणून घोषणा केल्याचे ते म्हणाले.

महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विश्वविद्यालय की बिल्डिंग का हुआ उद्घाटन

# देश को उत्कृष्ट जज और वकील देगा विधि विवि : न्या. बोबड़े

भास्कर प्रतिनिधि | नागपुर. लोकतंत्र के चार स्तंभों में से एक न्यायपालिका को सशक्त करने के लिए अच्छी विधि शिक्षा प्रणाली महत्वपूर्ण है। इसी उद्देश्य से महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विश्वविद्यालय की बुनियाद रखी गई थी। तत्कालीन राष्ट्रपति प्रतिभा पाटील से लेकर न्यायपालिका और राजनीति के अनेक व्यक्तियों ने इसके विकास में योगदान दिया। अब यह विवि देश को बेहतर परिणाम देने के लिए तैयार है।

## न्यायशास्त्र पढ़ाएंगे

देश के मुख्य न्यायाधीश शरद बोबड़े ने बुधवार को महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विश्वविद्यालय (एमएनएलयू) नागपुर की नई एकेडमिक बिल्डिंग के उद्घाटन समारोह में बतौर मुख्य अतिथि विचार रखे। उन्होंने कहा कि इस विवि में विद्यार्थियों को सीधे न्यायाधीश बनने की ट्रेनिंग दी जाएगी। पाठ्यक्रम में ही उन्हें कोर्ट रूम अनुभव, जजों के साथ समय व्यतित करने और अन्य प्रकार का प्रशिक्षण मिलेगा। इससे पाठ्यक्रम की समाप्ति तक वे जज बनने के लिए पात्र हो जाएंगे। प्राचीन भारतीय ज्ञान पर निर्भर न्यायशास्त्र नामक पाठ्यकम भी कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय के साथ मिल कर शुरू किया गया है। ऐसे में मुझे पूरा विश्वास है कि यह विश्वविद्यालय देश को बेहतर जज और वकील प्रदान करेगा।

## गरीबों को भी मिले कानूनी मदद

प्रदेश के मुख्यमंत्री उद्धव ठाकरे ने संबोधन में विद्यार्थियों से कहा कि विधि विवि से शिक्षा लेने के बाद विद्यार्थियों का कर्तव्य है कि वे अपने ज्ञान का फायदा समाज के आर्थिक



रूप से कमजोर तबकों को भी प्रदान करें। उन्हें भी बेहतर कानूनी मदद का अधिकार है। महंगी फीस के कारण वे इससे वंचित नहीं रहने चाहिए। जिस प्रकार एक मूर्तिकार प्राण फूंक कर गणेश व दुर्गा की प्रतिमा बनाता है, ऐसे ही शिक्षकों को पूर्ण समर्पण भाव से भविष्य के बेहतर जज और वकील तैयार करने हैं। विवि को राज्य सरकार हर संभव मदद करेगी।

**इन्होंने रखे विचार :** कार्यक्रम में बतौर विशेष अतिथि उपस्थित सर्वोच्च न्यायालय के न्यायमूर्ति भूषण गवई ने कहा कि विवि की निर्मिति निजी सार्थकता का ही एक क्षण है। असल मायनों में गुरुकुल की संकल्पना इस विवि के माध्यम से साकार हो रही है। इस दौरान ऑनलाइन उपस्थिति दर्ज कराते हुए केंद्रीय मंत्री नितीन गडकरी ने कहा कि न्यायपालिका लोकतंत्र का ही एक मजबूत स्तंभ है। विधि विवि इसे और मजबूत करने में सहकार्य करेगा। कार्यक्रम में बॉम्बे हाईकोर्ट के मुख्य न्या. दीपांकर दत्ता, प्रदेश उच्च शिक्षा मंत्री उदय सामंत, नागपुर जिले के पालकमंत्री नितीन राऊत, विपक्ष नेता देवेंद्र फडणवीस और नागपुर खंडपीठ के प्रशासकीय न्या. सुनील शुक्रे ने भी विचार व्यक्त किए। प्रस्तावना विवि कुलगुरु डॉ. विजेंद्र कुमार ने रखी। विवि शिक्षकों, विद्यार्थियों और पालकों के लिए कार्यक्रम का लाइव प्रसारण किया गया था।

## न्या. गवई बने विवि कुलपति

न्या. बोबड़े ने संबोधन में न्या. भूषण गवई को विश्वविद्यालय के नए कुलपति के रूप में घोषित किया। 23 अप्रैल को सेवानिवृत्त होने वाले न्या. बोबड़े इस विवि के पहले कुलपति हैं। उनके बाद न्या. गवई यह जिम्मेदारी संभालेंगे। न्या. बोबड़े ने बताया कि 13 अप्रैल को उन्होंने न्या. गवई का बतौर कुलपति नामांकन कर दिया है।

**Dainik Bhaskar / Nagpur Bhaskar / Thursday / April 15, 2021/Page No. 1**

उद्घाटन सोहळा सरन्यायाधीश शरद बोबडे यांचे प्रतिपादन

# आंबेडकरांना संस्कृत भाषा हवी होती

■ 60 एकरात साकारणार विद्यापीठ ■ 30,000 चौरस फुटात शैक्षणिक इमारत

महानगर प्रतिनिधी

**नागपूर.** प्रशासकीय कामकाजात कोणत्या भाषेचा वापर करावा, याबाबत नेहमीच वाद होत राहिलेला आहे. तसेच न्यायालयात कोणत्या भाषेचा वापर करावा, यासंदर्भातही मतभेद आहेत. परंतु याबाबत कुणीही गंभीर नसल्याचे दिसून येते. या दिशेने संविधानाचे शिल्पकार डॉ. भीमराव आंबेडकर यांनी एक प्रस्ताव तयार केला होता. हा प्रस्ताव संसदेत सादर करण्यात आला अथवा नाही, याबाबत माहिती नाही. मात्र सर्व धर्मप्रमुखांसोबत चर्चा केल्यानंतर त्यांनी संस्कृतला अधिकृत भाषेच्या स्वरुपात प्रस्तावित केले होते, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी केले.

बुधवारी वारंगा येथे महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या शैक्षणिक भवनाचे त्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, न्यायाधीश भूषण गवई, मुबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश दीपांकर दत्ता, पालकमंत्री नितीन राऊत, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आदी उपस्थित होते.

## विधी शिक्षण प्रणालीशिवाय हा स्तंभ मजबूत नाही



न्या. बोबडे पुढे म्हणाले की, जर उत्तर भारतात तामिळचा वापर केल्यास तो स्वीकारण्यात येत नाही. याप्रमाणेच दक्षिणमध्ये हिंदी भाषा मान्य नाही. परंतु संस्कृतला उत्तर ते दक्षिणपर्यंत मान्यता मिळू शकते. लोकशाहीच्या 4 स्तंभात विधीचे वेगळेच महत्त्व आहे. परंतु सक्षम विधी शिक्षण प्रणालीशिवाय हा स्तंभ मजबूत होऊ शकत नाही. यामुळेच विधी विद्यापीठाचे स्वप्न साकार झाले आहे. न्यायदानाच्या प्रक्रियेत तर्कांना अधिक महत्त्व देण्यात येते. एरिस्टोटल आणि पारसी प्रणालीत यास फार महत्त्व आहे. परंतु तज्ज्ञांसोबत झालेल्या चर्चेत प्राचीन भारतीय ग्रंथ न्यायशास्त्राला कोणत्याही प्रकारे कमी लेखण्यात आले नाही. महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाची निर्मिती आंतरराष्ट्रीय दर्जाची करण्यात आली आहे. ऑक्सफोर्ड, हॉर्वर्ड आणि कॅम्ब्रिज युनिव्हर्सिटीप्रमाणेच येथेही तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

## वकीलच नव्हे तर न्यायाधीशही होणार

न्या. बोबडे पुढे म्हणाले की, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठात केवळ वकीलच नव्हे तर न्यायाधीशसुद्धा तयार होतील. त्यांना विशेष प्रशिक्षणही उपलब्ध केल्या जाईल. एनडीएप्रमाणे केवळ सैनिकच नव्हे तर न्यायिक अधिकारीही तयार होतील. या अनुषंगानेच काही अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहे. लॉ युनिव्हर्सिटीसाठी न्यायाधीश भूषण गवई यांनी केलेल्या विशेष प्रयत्नांची प्रशंसा त्यांनी यावेळी केली. तसेच राज्यात कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी सर्वांनी यात योगदान दिले आहे. यासाठी भविष्यातील पिढी नेहमीच त्यांचे आभारी राहील. याप्रसंगी न्या. बोबडे यांनी न्यायमूर्ती भूषण गवई हे या विधी विद्यापीठाचे कुलपती असतील, असे जाहीर केले. विशेष म्हणजे 60 एकर जागेत विधी विद्यापीठ साकारण्यात येत आहे. पहिल्या चरणात 30,000 चौरस फुटात शैक्षणिक इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. शिल्लक असलेले काम लवकरच पूर्ण होईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

**Navrashtra / Thursday / April 15, 2021/Page No.**

# विधि विद्यापीठ जागतिक दर्जा मिळविणार

◆ नागपूर, १४ एप्रिल

न्यायव्यवस्था हा लोकशाही व्यवस्थेचा अतिशय महत्त्वाचा स्तंभ आहे. तो मजबुत करण्यासाठी उत्तम दर्जाच्या विधि शिक्षणाची आवश्यकता असून येथील राष्ट्रीय विधि विद्यापीठ त्या दृष्टीने महत्त्वाचे आणि जागतिक दर्जाचे ठरणार आहे. राष्ट्रीय दृष्टिकोन आणि चारित्र्य विकसित करण्यासाठी हे विद्यापीठ निश्चितच महत्त्वाचे योगदान देईल, असा विश्वास सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी आज येथे व्यक्त केला.

शहराजवळच्या वारंगा येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीचे उद्घाटन सरन्यायाधीश तथा या विद्यापीठाचे संस्थापक कुलपती शरद बोबडे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. दूरदृष्य प्रणालीद्वारे झालेल्या या कार्यक्रमास

## सरन्यायाधीश शरद बोबडे यांना विश्वास

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता, पालकमंत्री नितीन राऊत, तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती सुनील शुक्रे, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विजेंद्रकुमार आदी उपस्थित होते.

भाषणाच्या प्रारंभी विधि विद्यापीठाच्या निर्मितीमागचा ओझरता प्रवास सरन्यायाधीशांनी मांडला. नागपूर शहराला असलेली उत्तम विधिज्ञांची गौरवशाली परंपरा पाहता इथे राष्ट्रीय विधि विद्यापीठ

## विधि विद्यापीठ इमारतीचे उद्घाटन



असावे, अशी येथील नागरिकांची इच्छा होती. आज त्यांची स्वप्नपूर्ती होत असल्याबद्दल समाधान व्यक्त करून न्या. बोबडे म्हणाले, विद्यापीठाची शैक्षणिक इमारत हा आधुनिक वास्तुकलेचा सुंदर आविष्कार आहे. या इमारतीमधील वर्गखोल्यांचे बांधकाम हे जागतिक दर्जाचे आहे. अद्यावत तंत्रज्ञानाने सुसज्ज अशा या वर्गखोल्या आहेत. न्यायमूर्ती भूषण गवई या विधि विद्यापीठाचे कुलपती असतील, असे सरन्यायाधीशांनी यावेळी जाहीर केले. ते म्हणाले,

## न्या. भूषण गवई कुलपती होणार

येथील राष्ट्रीय विधि विद्यापीठ हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. या विद्यापीठातून राष्ट्रीय दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होणार आहे. कारण देशभरातील प्राध्यापक आणि विद्यार्थी येथे अध्ययन- अध्यापन करणार आहेत. इथे प्रादेशिकता, संकुचितता यापेक्षा पुढे जाऊन राष्ट्रीय चारित्र्य असलेले विधिज्ञ घडतील. ऑक्सफर्ड- हॉर्वर्ड- केंम्ब्रीज या विद्यापीठाच्या तोडीचे विद्यापीठ ठरणार असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. यावेळी बोलताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी, लोकशाहीचे छत समर्थपणे तोलून धरणारे वकील, विधिज्ञ या विद्यापीठात घडावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

विधि क्षेत्रात गुणात्मक बदल व्हावा, त्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे विद्यापीठ उभारावे या उद्देशाने या विद्यापीठाची स्थापना करण्यात आल्याचे सांगून नितीन गडकरी यांनी, मजबुत लोकशाहीचा एक स्तंभ न्यायव्यवस्थेचा असतो. तो उभारण्यासाठी विधि विद्यापीठाची महत्त्वाची भूमिका राहणार असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक प्रा. आशीष सिंह यांनी केले तर आभार. प्रा. सी. रमेशकुमार यांनी मानले. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती विकास सिरपूरकर यांची यावेळी उपस्थिती होती. उद्घाटनानंतर मान्यवरांनी इमारतीची पाहणी केली. विधि विद्यापीठाच्या इमारतीची वैशिष्ट्ये दाखवणारी छोटी चित्रफित यावेळी दाखविण्यात आली.

◀(*तभा वृत्तसेवा*)

**Tarun Bharat / Aapal Nagpur / Thursday / April 15, 2021/Page No. 11**